चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
२३ जानेवारी,२०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)

# चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक २२/०१/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, बल्लारशाह, पडोली, भद्रावती, माजरी, ब्रम्हपुरी, नागभिड, तळोधी, मुल, पाथरी, सिंदेवाही, गोंडपिंपरी, जिवती, पाटण, तळोधी, रामनगर** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१९** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **०५** आरोपींना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **१,३७,२००/—रू.** चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

## ६) पोलीस स्टेशन तळोधी :—

दिनांक **२२/०१/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **तळोधी** अंतर्गत ०२ आरोपी ईसम हे सटट्रापटट्रीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **तळोधी** येथे अप. क्र. **१३/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०२ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **१६५/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **तळोधी** पोलीस करीत आहे.

---

# चंद्रपुर शहर पोलीसांनी चोरीचा गुन्हा आणला उघडकीस
# चोरीच्या मालासह दोन आरोपी जेरबंद

दिनांक २५/११/२०१८ रोजी फिर्यादी नामे बबलु वसंतराव खानकुरे वय २९ रा. बिनवा वार्ड चंद्रपुर यांनी पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे येवुन तक्रार दिली की, ते आपल्या मालकाच्या दवाखान्यात कामावर असतांना दोन अज्ञात इसमानी आपल्या मोटारसाईकल ने त्यांच्या दवाखान्यात प्रवेश करून मोबाईल आणि इतर साहित्याची चोरी केली. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे अप.क्र. १३३७/२०१८ कलम ४५७, ३८०, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनात सुरू करण्यात आला. तपासादरम्यान पोलीसांनी वेगवेगळया पदध्तीने तर्क लावुन गोपनीय माहिती काढणे सुरू केले. तपासादरम्यानच दिनांक २१/०१/२०१९ रोजी चंद्रपुर शहर पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, एक इसमाने एका दुकानात चोरीस गेलेल्या वर्णनाचा मोबाईल विक्री करीता आणलेला आहे. यावरून पोलीस पथकाने सापळा रचुन **१)आरोपी नामे जाबु उर्फ जुबेर मतीन शेख** यास मोबाईलसह ताब्यात घेतले. सदर आरोपीकडुन दुसऱ्या आरोपीबाबत विचारपुस केली असता घटनेच्या दिवशी दवाखान्यात चोरी करणारा दुसरा **२)आरोपी नामे मोहसीन अहमद शेख वय १९ रा. जटपुरा गेट वार्ड, चंद्रपुर** यास सुध्दा अटक करण्यात आली. सदर दोन्ही आरोपीतांना चोरीच्या मालाबाबत विचारपुस केली असता त्यांच्या जवळ एक चोरी केलेला ओपो कंपनीचा मोबाईल फोन कि. १४,०००/—रू, दवाखान्यातील साहित्य किं. २,०००/—रू, एक मॉनीटर किं. ५,०००/—रू, गुन्हयात वापरलेली डयुक केटीएम मोटारसायकल किं. १,२५,०००/—रू असा एकुण १,४६,३००/—रू चा मुद्देमालासह दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास चंद्रपुर शहर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक चंद्रपुर शहर श्री. एस.एस. भगत यांचे नेतृत्वात सपोनि. श्री. रहागंडाले, पोहवा. सिध्दार्थ रंगारी, सुरेश केमेकर, पोना.संजय आतकुलवार, प्रकाश बल्की, उमेश रोडे यांनी पार पाडली.

---